# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

**मराठी विभाग**

## विद्यार्थ्यांनी प्रसारमाध्यमांमधील संधींचा करिअरसाठी विचार करावा : खुडे

**राजगुरूनगर । वार्ताहर**

माणसाच्या जीवनाची सर्व क्षेत्रे प्रसारमाध्यमांनी व्यापली असून प्रसारमाध्यमांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यासाठी लागणाऱ्या तज्ज्ञ मनुष्यबळाची गरज लक्षात घेता विशेष स्तरावर मराठी भाषेचे अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षण घेताना प्रसारमाध्यमांमधील संधींचा आपल्या करिअरसाठी विचार करावा असे आवाहन पत्रकार किरण खुडे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी विभाग व मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात प्रसारमाध्यमातील संधी या विषयावर बोलत होते.

या प्रसंगी मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. किशोर लांडेपाटील आणि द्वितीय व तृतीय वर्षातील मराठी विशेष स्तरावर शिकणारे विद्यार्थी उपस्थित होते.

प्रसारमाध्यमातील संधींविषयी पुढे बोलताना ते म्हणाले की, सिनेमा, आकाशवाणी, दूरदर्शन, वर्तमानपत्र, जाहिरात, माहितीपट आदि अनेक क्षेत्रात विद्यार्थ्यांना खूप संधी असून त्यासाठी त्यांना सृजनशील कल्पना सूचण्याची गरज आहे. या नाविण्यपूर्ण कल्पनांचे त्यांना योग्य सादरीकरण करता यायला हवे. यावेळी त्यांनी चित्रपट दिग्दर्शक जी.पी. सीप्पी यांच्या शोले व प्रविण तरडे यांच्या मुळशी पॅटर्न या चित्रपटांच्या पटकथेबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. तसेच वृत्तनिवेदनाच्या कामातून पुढे अभिनेत्री झालेल्या स्मिता पाटील यांच्या कार्याविषयी माहिती दिली. याशिवाय प्रसारमाध्यमांमध्ये लेखक, राजकीय लेखक, कला, क्रिडा, ऐतिहासिक लेखक, प्रकाशन




संस्था, इव्हेंट मॅनेजमेंट, वितरण संस्था, निवेदक, ॲनिमेटर, क्रिएटिव्ह डायरेक्टर्स, एडीटर्स, पब्लिक रिलेशन ऑफीसर, पटकथा लेखक, साउंडमॅन, व्हीडीओ जॉकी, रेडीओ जॉकी, प्रोग्राम डेव्हलपर अशी अनेक पदे उपलब्ध आहेत. सर्जनशिल बुध्दी, वेळेची स्पर्धा, सांघिक व आव्हानात्मक काम करण्याची वृत्ती असणाऱ्या व्यक्तींसाठी हे क्षेत्र आहे, असेही ते म्हणाले.

प्रा. डॉ. बी. डी. अनुसे यांनी प्रसारमाध्यमात अध्ययन करताना रोजगाराच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत याची माहिती सांगितली. विद्यार्थ्यांनी वाचन, लेखन कौशल्य आत्मसात करताना सूत्रसंचालनाचा करिअरसाठी विचार करण्याचे आवाहन केले. प्रा. किशोर लांडेपाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभारप्रदर्शन केले.

लोकमत पुणे, शुक्रवार, दि. २८ डिसेंबर २०१८

## प्रसारमाध्यमांत मोठी संधी : खुडे

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : माणसाच्या जीवनाची सर्व क्षेत्रे प्रसारमाध्यमांनी व्यापली असून प्रसारमाध्यमांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे, त्यासाठी तज्ज्ञ मनुष्यबळाची गरज आहे, त्यामुळे मराठी भाषेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि भाषेवर प्रभुत्व असणाऱ्या विद्यार्थ्यांना या क्षेत्रात मोठी संधी आहे, असे प्रतिपादन किरण खुडे यांनी केले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभाग व मराठी वाङ्मय मंडळाच्यावतीने आयोजित कार्यक्रमात प्रसारमाध्यमांतील संधी या विषयावर बोलत होते.

यावेळी मराठी वाङ्मय मंडळप्रमुख डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. किशोर लांडेपाटील आणि द्वितीय व तृतीय वर्षातील मराठी विशेषस्तरावर शिकणारे विद्यार्थी उपस्थित होते.

खुडे म्हणाले, की सिनेमा, आकाशवाणी, दूरदर्शन, वर्तमानपत्र, जाहिरात, माहितीपट आदी अनेक क्षेत्रांत विद्यार्थ्यांना खूप संधी असून त्यासाठी त्यांना सृजनशील कल्पना सुचण्याची गरज आहे. या नावीन्यपूर्ण कल्पनांचे त्यांना योग्य सादरीकरण करता यायला हवे. याशिवाय प्रसारमाध्यमांमध्ये लेखक, राजकीय लेखक, कला, क्रीडा, ऐतिहासिक लेखक, प्रकाशन संस्था, इव्हेंट मॅनेजमेंट, वितरण संस्था, निवेदक, ॲनिमेटर, क्रिएटिव्ह डायरेक्टर्स, एडिटर्स, पब्लिक रिलेशन ऑफिसर, पटकथालेखक, साऊंडमन, व्हिडीओ जॉकी, रेडिओ जॉकी, प्रोग्राम डेव्हलपर अशी अनेक पदे उपलब्ध आहेत.

प्रा. डॉ. बी. डी. अनुसे यांनी प्रसारमाध्यमातील रोजगाराच्या कोणत्या संधींची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी वाचन, लेखनकौशल्य आत्मसात करताना सूत्रसंचालनाचा करिअरसाठी विचार करण्याचे आवाहन केले.



राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात 'प्रसारमाध्यमांमधील संधी' या विषयावर बोलताना किरण खुडे.

जनप्रवास
बुधवार, दि. १९ डिसेंबर २०१८

# विद्यार्थ्यांनी प्रसारमाध्यमांमधील संधींचा करिअरसाठी विचार करावा : खुडे



राजगुरुनगर | वार्ताहर

माणसाच्या जीवनाची सर्व क्षेत्रे प्रसारमाध्यमांनी व्यापली असून प्रसारमाध्यमांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. त्यासाठी लागणाऱ्या तज्ज्ञ मनुष्यबळाची गरज लक्षात घेता विशेष स्तरावर मराठी भाषेचे अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षण घेताना प्रसारमाध्यमांमधील संधींचा आपल्या करिअरसाठी विचार करावा असे आवाहन पत्रकार किरण खुडे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी विभाग व मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात प्रसारमाध्यमातील संधी या विषयावर बोलत होते.

या प्रसंगी मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. किशोर लांडेपाटील आणि द्वितीय व तृतीय वर्षातील मराठी विशेष स्तरावर शिकणारे विद्यार्थी उपस्थित होते.

प्रसारमाध्यमातील संधींविषयी पुढे बोलताना ते म्हणाले की, सिनेमा, आकाशवाणी, दूरदर्शन, वर्तमानपत्र, जाहिरात, माहितीपट आणि अनेक क्षेत्रात विद्यार्थ्यांना खूप संधी असून त्यासाठी त्यांना सृजनशील कल्पना मुखपत्राची गरज आहे. या कौशल्यपूर्ण कल्पनांचे त्यांना योग्य सादरीकरण करता यायला हवे. याबेळी त्यांनी चित्रपट दिग्दर्शक जी.पी. लोणी यांच्या शाळे व प्रवीण तरडे यांच्या मुळशी पॅटर्न या चित्रपटाच्या पटकथेबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. तसेच वृत्तनिवेदनाच्या कामातून पुढे अभिनेत्री झालेल्या स्मिता पाटील यांच्या कार्याविषयी माहिती दिली. याशिवाय प्रसारमाध्यमांमध्ये लेखक, राजकीय लेखक, कला, क्रिडा, ऐतिहासिक लेखक, प्रकाशन संस्था, इव्हेंट मॅनेजमेंट, वितरण संस्था, निवेदक, ॲनिमेटर, क्रिएटिव्ह डायरेक्टर्स, एडीटर्स, पब्लिसिटी [illegible] ऑफिसर, पटकथा लेखक, साउंडमॅन, व्हीडीओ जॉकी, रेडीओ जॉकी, प्रोग्राम डेव्हलपर अशी अनेक पदे उपलब्ध आहेत. सर्जनशील बुद्धी, वेळेची स्पर्धा, साधिक व आव्हानात्मक काम करण्याची वृत्ती असणाऱ्या व्यक्तीसाठी हे क्षेत्र आहे, असेही ते म्हणाले.

प्रा. डॉ. बी. डी. अनुसे यांनी प्रसारमाध्यमात अध्ययन करताना रोजगाराच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत याची माहिती सांगितली. विद्यार्थ्यांनी वाचन, लेखन कौशल्य आत्मसात करताना सूत्रसंचालनाचा करिअरसाठी विचार करण्याचे आवाहन केले. प्रा. किशोर लांडेपाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभारप्रदर्शन केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख